MHSI0400004422011

## नियमित दिवाणी दावा क्र. १०३ सन २०१६ निशाणी ९२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १२ड यांचेविरुध्द झालेला दिनांक २४/०२/२०२५ रोजीचा दावा खारीज करणेबाबतचा केलेला आदेश रद्द (Set aside) होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादी याचे कथन असे की, प्रस्तुत कामी वादीने मागील तारखांना प्रतिवादी क्र. १२ड याचे बजावणीबाबत तजवीज न केल्याने त्याचे विरुध्द दिनांक २४/०२/२०२५ रोजी दावा खारीज करण्याचा आदेश न्यायालयाने केला आहे. परंतु प्रतिवादी क्र. १२ड चा योग्य पत्ता उपलब्ध न झाल्याने वादीस प्रतिवादी क्र. १२ड च्या बजावणीची तजवीज करता आली नाही. सबब प्रतिवादी क्र. १२ड विरुध्द दावा खारीज करण्याचा आदेश रद्द करुन मिळणे आवश्यक आहे. तसे न केल्यास दाव्याच्या कामी व्यंगता निर्माण होणारी आहे. सबब, वादीने प्रतिवादी क्र. १२ड विरुध्द दावा खारीज करणेबाबतचा केलेला आदेश रद्द करुन बजावणीची तजवीज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीचे प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १२ड विरुध्द दावा खारीजचा झालेला आदेश रद्द होऊन मिळण्याची वादी मागणी करत आहे. तथापी सदर अर्जासोबत प्रतिवादी क्र. १२ड च्या दावा समन्सची तजवीज होणेबाबत वादीने अर्ज सादर करणे आवश्यक होते परंतु, तसा अर्ज दाखल असल्याचे दिसून येत नाही. यावरुन वादीला प्रतिवादी क्र. १२ड चे तजविज करणेस स्वारस्य नसल्याचे दिसून येते. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा. यदाकदाचित, अर्ज मंजुर करणेचे निष्कर्षप्रत न्यायालय आल्यास प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांना रुपये २०००/– कॉस्ट देवविणेबाबत वादीस आदेश व्हावेत अशी विनंती प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांनी केली आहे.

**०४.** अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदरचा दावा प्रतिवादी क्र. १२ड ची तजवीज करणेसाठी दिनांक ०२/०८/२०२४ पासून प्रलंबित

आहे. वादीस उचीत संधी देऊनही त्यांनी उपरोक्त प्रतिवादीची समन्स बजावणीबाबत तजविज केलेली नाही. सबब, प्रतिवादी क्र. १२ड विरुध्द दिनांक २४/०२/२०२५ रोजी दावा खारीज करण्याबाबत आदेश पारित करण्यात आला. अर्जातील वादीचे कथन विचारात घेता, प्रतिवादी क्र. १२ड चा योग्य पत्ता उपलब्ध न झाल्याने वादीस प्रतिवादी क्र. १२डच्या बजावणीची तजवीत करता आली नाही. वादीने प्रस्तुतचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता व कायम ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी क्र. १२ड दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. तसेच, प्रतिवादी क्र.१२ड यांना प्रस्तुत दाव्याच्या कामी सामिल न केल्यास वादी यांना कायद्यानुसार इतर मार्गाने तजविज करावी लागेल व त्यामुळे multiplicity of proceeding होण्याची शक्यता आहे. प्रस्तुतचा दावा हा सन २०१६ मध्ये दाखल केलेला असून सदर दाव्यास पाच वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. प्रतिवादी क्र. १२ड यास प्रस्तुत दाव्याचे कामी सामिल केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याऊलट, प्रस्तुत दावा गुणवत्तेवर चालविण्यास न्यायालयास मदत होणार आहे. सबब, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ मध्ये दिलेल्या न्यायालयाच्या अंगभुत शक्तीचा वापर करता येऊ शकतो. सदर तरतुदीनुसार दिवाणी प्रक्रीया संहितेमधील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायाची उद्दीष्टे साध्य करण्यासाठी किंवा न्यायालयाच्या कार्यवाहीचा दुरुपयोग टाळण्यासाठी आवश्यक असतील ते आदेश काढण्याचा प्रस्तुत न्यायालयास अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १२ड त्यांना याकामी हजर होऊन आपले म्हणणे सादर करण्याची संधी देणे उचित ठरेल. परंतु, वादीने प्रतिवादी क्र. १२ड यांची तजविज करणेस केलेल्या विलंबामुळे प्रतिवादी यांचा तसेच न्यायालयाचा बहुमुल्य वेळ वाया गेला आहे. सबब, वादी यांचेवर वाजवी खर्च आकारुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**-: आदेश :-**

१. वादी यांनी प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांना रु. ५००/- इतका खर्च देण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी यांना खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १२ड यांचे विरुध्द झालेला दावा खारिज आदेश रद्द करण्यात येतो.

३. वादी यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत किंवा तत्पुर्वी प्रतिवादीस अदा करावी तसेच, प्रतिवादी क्र. १२ड यांचे बजावणीबाबत तजविज त्वरीत करावी अन्यथा प्रतिवादी क्र.१२ड यांचे विरुध्द झालेला दावा खारीजचा आदेश जैसे थे असल्याचा समजण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.03.28 16:55:56 +0530

कुडाळ. (पी. आर. ढोरे)
दिनांक : २६/०३/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ